## 2. घटनानिर्मिती

**पार्श्वभूमी :-**

**❍ भारतासाठी संविधान सभेची मागणी :-**

- 1895 - लोकमान्य टिळकांनी स्वराज्य विधेयकात संविधान सभेच्या सिद्धांताचे दर्शन घडविले.
- 1922 - महात्मा गांधींनी हरिजन / यंग इंडिया वृत्तपत्रातून संविधान सभेचा उल्लेख न करता मागणी केली व भारताचे संविधान भारतीयांनी तयार करावे असे सांगितले.
- 1934 - मानवेंद्रनाथ रॉय यांनी भारतासाठी संविधान सभेची कल्पना सर्वप्रथम मांडली.
- डिसेंबर, 1934 मध्ये झालेल्या राष्ट्रीय कॉंग्रेस सभेच्या पाटना अधिवेशनात संविधान सभेची प्रथम मागणी केली.
- 1938 - पंडित नेहरुंनी भारताचे संविधान प्रौढ मताद्वारे निवडुण आलेल्या संविधान सभेद्वारे बाह्यप्रभावाविना तयार करण्यात येईल.
- 1940 - ऑगस्ट घोषणेमध्ये भारताचे संविधान मुख्यत: किंवा अंशत: भारतीयांनी तयार करावे. हे तत्त्व मान्य केले.
- 1942 - क्रिप्स योजना. भारताचे संविधान पुर्णत: भारतीयांनीच तयार करावे, हे तत्त्व मान्य करण्यात आले.

**❍ संविधान सभेच्या निर्मितीसाठी कॅबिनेट मिशनची स्थापना (1946) :-**

- अध्यक्ष - सर पॅथिक लॉरेन्स
- सदस्य - स्टॅफोर्ड क्रिप्स, ए.व्ही. अलेक्झांडर
- भारतात आगमन - 24 मार्च, 1946
- घटना समितीच्या निवडणुकीचे नियोजन - 16 मे, 1946
- ब्रिटीश पार्लमेंटची मान्यता - 26 मे, 1946

**❍ संविधान सभेच्या निवडणुकीतील जागांची विभागणी :-**

- 10 लाख लोकसंख्येमागे 1 मतदारसंघ.
- 3 प्रमुख गटात मतदार संघाची विभागणी.
- शीख - 4 मतदार संघ.
- मुस्लीम - 79 मतदार संघ.
- सर्वसाधारण - 213 मतदार संघ.

**❍ घटना समितीमधील निवडुन आलेले सदस्य (जुलै 1946 - 15 ऑगस्ट, 1947)**

| अ.क्र. | क्षेत्र | जागा |
|---|---|---|
| 1. | ब्रिटिश राज्यातील भारतीय प्रांत | 292 |
| 2. | राज्य संस्थाने (भारतीय संस्थाने) | 93 |
| 3. | मुख्य आयुक्तांचे प्रांत (दिल्ली, अजमेर, कुर्ग, बलुचिस्तान) | 4 |
| | **एकूण** | **389** |

**❍ घटना समितीमधील स्वातंत्र्यानंतरचे सदस्य (15 ऑगस्ट, 1947 ते 26 जानेवारी, 1950)**

| अ.क्र. | क्षेत्र | जागा |
|---|---|---|
| 1. | ब्रिटिश राज्यातील भारतीय प्रांत | 229 |
| 2. | राज्य संस्थाने (भारतीय संस्थाने) | 70 |
| 3. | मुख्य आयुक्तांचे प्रांत | 0 |
| | **एकूण** | **299** |

❍ **घटना समितीमध्ये पक्षनिहाय निवडुण आलेले सदस्य (जुलै-ऑगस्ट, 1946)**

| अ.क्र. | पक्ष | जिंकलेल्या जागा |
|---|---|---|
| 1. | काँग्रेस | 208 |
| 2. | मुस्लीम लीग | 73 |
| 3. | युनियनिस्ट पक्ष | 1 |
| 4. | युनियनिस्ट मुस्लीम | 1 |
| 5. | युनियनिस्ट अनुसूचित जाती | 1 |
| 6. | कृषक प्रजा पक्ष | 1 |
| 7. | अनुसूचित जाती फेडरेशन | 1 |
| 8. | शीख (बिगर काँग्रेस) | 1 |
| 9. | साम्यवादी पक्ष | 1 |
| 10. | अपक्ष | 8 |
| | **एकूण** | **296** |

❍ **संविधान सभेत निवडुन आलेल्या 15 महिला प्रतिनिधी व त्यांचे मतदार संघ**

| अ.क्र. | महिला प्रतिनिधी | मतदार संघ |
|---|---|---|
| 1. | अम्मू स्वामीनाथन | मद्रास |
| 2. | दक्षयनी वेलायुदन | मद्रास |
| 3. | दुर्गाबाई देशमुख | मद्रास |
| 4. | हंसाबेन मेहता | बॉम्बे |
| 5. | राजकुमारी अमृता कौर | केंद्रीय प्रांत |
| 6. | सरोजिनी नायडू | बिहार |
| 7. | मालती चौधरी | ओडिसा |
| 8. | ॲनी मस्करीन | त्रावणकोर |
| 9. | लीला रे | बंगाल |
| 10. | रेणुका रे | बंगाल |
| 11. | सुचेता कृपलानी | उत्तरप्रदेश |
| 12. | कमला चौधरी | उत्तरप्रदेश |
| 13. | पूर्णिमा बॅनर्जी | उत्तरप्रदेश |
| 14. | विजयालक्ष्मी पंडित | उत्तरप्रदेश |
| 15. | बेगम रसुल | उत्तरप्रदेश |

❍ **संविधान सभेचे कामकाज :-**

**पहिली बैठक - 9 डिसेंबर, 1946.**

- **ठिकाण -** सेंट्रल हॉल, दिल्ली
- **हंगामी अध्यक्ष -** डॉ. सच्चिदानंद सिंह (हे नाव जे.पी. कृपालानी यांनी सुचविले.)
- **उपाध्यक्ष -** फ्रँक अन्थोनी (मनोनीत)
- **उपस्थित सदस्य -** 211 (पैकी 9 महिला)

**दुसरी बैठक - 11 डिसेंबर, 1946**

- **ठिकाण -** सेंट्रल हॉल, दिल्ली
- **अध्यक्ष -** डॉ. राजेंद्रप्रसाद
- **उपाध्यक्ष -** डॉ. एच.सी. मुखर्जी (नेमणूक - 25 जानेवारी 1947)
- **सचिव -** एच.व्ही.आर. आय्यंगार
- **कायदेविषयक घटनात्मक सल्लागार -** डॉ. बी.एन. राव
- **बोधचिन्ह -** हत्ती

❍ **संविधान सभेच्या समित्या :-**

संविधान सभेने घटनानिर्मितीसाठी वेगवेगळी कामे पूर्ण करण्यासाठी विविध समित्यांची निर्मिती केली त्यात प्रमुख 8 समित्या तर गौण 13 समित्या व 1 घटना समिती अशी एकुण 22 समित्यांनी घटनानिर्मितीचे काम केले.

❍ **संविधान सभेतील प्रमुख 8 समित्या व अध्यक्ष.**

| | समिती | अध्यक्ष |
|---|---|---|
| 1) | मसुदा / प्रारुप समिती | डॉ. बाबासाहेब आंबेडकर |
| 2) | संघराज्य अधिकार समिती | जवाहरलाल नेहरु |
| 3) | संघराज्य घटना समिती | जवाहरलाल नेहरु |
| 4) | प्रांतिक घटना समिती | वल्लभभाई पटेल |
| 5) | कार्यपद्धती व नियम समिती | डॉ. राजेंद्र प्रसाद |
| 6) | राज्यांशी चर्चेसाठी समिती | जवाहरलाल नेहरु |
| 7) | सुकाणू समिती | डॉ. के.एम. मुन्शी/ राजेंद्र प्रसाद |
| 8) | मुलभूत हक्क व अल्पसंख्यांक समिती | वल्लभभाई पटेल. |
| | i) मुलभुत हक्क उपसमिती | जे.बी. कृपलानी |
| | ii) अल्पसंख्यांक उपसमिती | एच.सी. मुखर्जी |

❍ **संविधान सभेतील गौण समित्या व अध्यक्ष (एकूण 13) :-**

1) घटनेचा मसुदा परीक्षण करणारी विशेष समिती : पंडित जवाहरलाल नेहरु.
2) वृत्तपत्र कक्ष समिती : ऊषा नाथ सेन
3) सर्वोच्च न्यायालयाबाबत हंगामी समिती : एस. वरदाचारी (घटना समितीचे सदस्य नव्हते.)
4) अधिकारपत्रे समिती : अल्लादी कृष्णस्वामी अय्यर
5) गृह समिती : बी. पट्टाभी सीतारामय्या
6) वित्त व कर्मचारी समिती : डॉ. राजेंद्रप्रसाद
7) भाषावार प्रांतांसंबंधी समिती : एस.के.दार (घटना समितीचे सदस्य नव्हते.)
8) प्रांतांच्या मुख्य आयुक्तांची समिती : बी. पट्टाभी सीतारामय्या
9) भारतीय राज्यघटनेतील आर्थिक तरतुदीविषयक तज्ज्ञांची समिती : नलिनी रंजन सरकार (घटना समितीच्या सदस्या नव्हत्या.)

10) नागरिकत्वावरील एतदर्थ समिती : एस. वरदाचारी
11) कामकाज क्रम समिती : डॉ. के.एम. मुन्शी
12) राष्ट्रध्वजासंबंधी हंगामी समिती : डॉ. राजेंद्रप्रसाद
13) घटना समितीच्या कार्याविषयी समिती : ग.वा. मावळणकर

**❍ मसुदा / प्रारुप समिती :-**

- डॉ. आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली 29 ऑगस्ट, 1947 रोजी मसुदा समिती स्थापन करण्यात आली. या समितीमध्ये अध्यक्षासह एकुण 7 सदस्य होते.

1) डॉ. बाबासाहेब आंबेडकर - अध्यक्ष
2) एन. गोपालस्वामी अय्यंगार
3) अल्लादी कृष्णस्वामी अय्यर
4) सईद अहमद सादुल्लाह
5) डॉ. के. एम. मुन्शी
6) एन. माधव राव (बी.एल. मित्तर यांनी अनारोग्याच्या कारणामुळे राजीनामा दिल्याने एन. माधव राव यांची नियुक्ती करण्यात आली.)
7) टी.टी. कृष्णमाचारी (1948 मध्ये डि.पी. खेतान यांच्या मृत्युनंतर कृष्णमाचारी यांची नियुक्ती करण्यात आली. कायद्याचा अभ्यास नसणारे एकमेव सदस्य.)

- मसुदा समितीने विविध समित्यांनी दिलेले प्रस्ताव विचारात घेऊन भारतीय राज्यघटनेचा मसुदा तयार केला.
- लोकांनी एकुण 7653 सुधारणा सुचविल्या त्यापैकी 2473 सुधारणांवर चर्चा करण्यात आली व मसुदा प्रसिद्ध करण्यात आला.
- पहिला मसुदा प्रसिद्ध - फेब्रुवारी, 1948
- दुसरा मसुदा प्रसिद्ध - ऑक्टोबर, 1948
- तिसरा मसुदा प्रसिद्ध - 4 नोव्हेंबर, 1948
- मसुदा समितीने मसुदा 6 महिन्यापेक्षा कमी कालावधीमध्ये म्हणजेच 141/114 दिवसात तयार केला.

- **डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुढील समितीचे सदस्य होते.**

1. मुलभूत हक्क व अल्पसंख्याक समिती
2. मुलभूत हक्क उपसमिती
3. अल्पसंख्यांक उपसमिती
4. सल्लागार समिती
5. संघराज्य राज्यघटना समिती


**❍ भारतीय स्वातंत्र्याचा कायदा 1947 अन्वये, संविधान सभेतील 3 महत्त्वपूर्ण बदल :-**

- सभा पूर्णतः सार्वभौम संस्था बनली. थोडक्यात तिला आपल्या मर्जीने घटना तयार करण्याचा अधिकार प्राप्त झाला.
- सभा एक कायदेमंडळ झाली. आता तिला 2 कामे करावी लागत.
  - अ) देशासाठी घटना तयार करणे. घटना तयार करताना अध्यक्ष हे डॉ. राजेंद्र प्रसाद असायचे.
  - ब) देशासाठी कायदे करणे. करताना अध्यक्ष हे जी.व्ही. मावळणकर असायचे ज्यांची 17 नोव्हेंबर, 1947 रोजी निवड करण्यात आली होती.
- सभेची एकुण संख्या पूर्वीच्या 1946 मधील नियोजित संख्येपेक्षा कमी झाली. (389 ऐवजी 299)

**❍ संविधान सभेची इतर कामे :-**


- पंडित नेहरुंनी 13 डिसेंबर, 1946 रोजी सादर केलेल्या उद्देशपत्रिकेला 22 जानेवारी, 1947 रोजी मान्यता दिली.
- 22 जुलै, 1947 रोजी संविधान सभेने भारताचा राष्ट्रीय ध्वज स्विकृत केला व मान्य केला. त्याची डिझाईन आंध्रप्रदेशातील पिंगली व्यंकय्या यांनी तयार केली.
- 17 नोव्हेंबर, 1947 पासुन संविधान सभेने घटना निर्मितीबरोबर कायदेमंडळ म्हणुन काम केले.
- घटना निर्माण करताना अध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद असायचे तर कायदेमंडळ म्हणुन कार्य करताना ग.वा. मावळणकर हे अध्यक्ष असायचे.

**घटना समितीचे अधिवेशने**



- मे, 1949 मध्ये संविधान सभेने भारताच्या राष्ट्रकुलाच्या सदस्यत्वाला अनुमोदन दिले.
- 24 जानेवारी, 1950 रोजी झालेल्या संविधान सभेच्या शेवटच्या बैठकीत पुढील निर्णय घेण्यात आले. (299 पैकी 284 सदस्य उपस्थित.)
  1) राष्ट्रगीत व राष्ट्रगाण स्विकृत केले.
  2) डॉ. राजेंद्रप्रसाद यांची राष्ट्रपती म्हणुन नेमणुक करण्यात आली.
  3) संविधान सभेला तात्पुरती संसद म्हणुन घोषित करण्यात आले.

### घटना समितीचे विशेष कार्य




### ❍ घटना समितीचा कालावधी व खर्च :-

- 2 वर्ष, 11 महिने, 17/18 दिवस. (एकुण दिवस 1082). प्रत्यक्ष कामकाज 166 दिवस.
- खर्च - 63 लाख, 96 हजार, 729 रुपये, 50 पैसे. (64 लाख)
- ज्ञात असलेल्या 60 देशांच्या घटनेचा अभ्यास करुन घटना तयार करण्यात आली.

### ❍ घटना अंगिकृत व स्वीकृत :-

- 26 नोव्हेंबर, 1949 रोजी भारताचे संविधान अंगिकृत व स्वीकृत करण्यात आले.
- त्याच दिवशी उपस्थित 284 सदस्यांनी घटनेवरती सह्या केल्या व पुढील कलमाची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरु झाली.
- कलम - 5 ते 9, 60, 324, 366, 367, 379, 380, 388, 391, 392, 393 या कलमामध्ये नागरिकत्व निवडणुका, तात्पुरती संसद, तात्पुरत्या तरतुदी आणि लघुशिर्षक यांच्या तरतुदी होत्या.
- या तरतुदी कलम 394 नुसार लागू झाल्या आहेत.

### ❍ घटनेची अंमलबजावणी :-

- 26 जानेवारी, 1950 पासुन घटनेची अंमलबजावणी झाली.
- भारतीय घटना जगातील सर्वात मोठी लिखित 251/277 पानांची ठरली.
- भारतीय घटनेत 22 भाग, 8 परिशिष्ठे आणि 395 कलमे होती. सध्या 25 भाग, 12 परिशिष्टे, 491 कलमे आहेत.

### ❍ भारतीय राज्यघटनेची मुळप्रत :-

- इटालीक इंग्रजी भाषेतील मुळ राज्यघटनेतील हस्तलिखित लिखान प्रेमबिहारी नारायण रायजादा यांनी केले.
- हिंदी भाषेतील मुळ राज्यघटनेचे हस्तलिखित लिखान वसंत क्रिशन वैद्य यांनी केले.
- वरील इंग्रजी आणि हिंदी भाषेतील राज्यघटनेच्या मुळ प्रती सध्या संसदेच्या ग्रंथालयात आहेत.
- जगातील पहिली लिखित राज्यघटना अमेरिकेची असून ती 4 महिन्यात 4 पानांची व 7 कलमे असणारी तयार करण्यात आली.
- जगातील सर्वात लहान लिखित राज्यघटना स्वित्झर्लंड देशाची 3 पानांची आहे.

### ❍ अलिखित राज्यघटना असणारे देश -

i) इंग्लड
ii) न्युझिलंड
iii) कॅनडा
iv) इस्राईल
v) सौदी-अरेबिया

### ❍ घटना समितीतील बिगर काँग्रेसचे सदस्य -

| | |
|---|---|
| 1. डॉ. आंबेडकर | 2. एम. आर जयकर |
| 3. डॉ. राधाकृष्णन | 4. एच. सी. मुखर्जी |
| 5. श्यामाप्रसाद मुखर्जी | 6. बी. शिवाराम |
| 7. ठाकुर भार्गवदास | 8. पी.एस.देशमुख |
| 9. महावीर त्यागी | 10. के. टी. शहा |
| 11. कृष्णास्वामी अय्यर | 12. टेकचंद बक्शी |
| 13. हृदनाथ कुंजरू | 14. एन. जी. अय्यंगार |

- तेजबहादूर सप्रु व जयप्रकाश नारायण यांनी आजारपणामुळे संविधान सभेचे सदस्यत्व स्विकारले नाही.
- महात्मा गांधी बॅरिस्टर जिना यांनी संविधान सभा प्रातिनिधीक संस्था असल्यामुळे सदस्यत्व स्विकारले नाही.
- भारतीय संविधान हे भारतीय जनतेच्या इच्छेनुसार असेल आणि भारताचे संविधान भारतीयच तयार करतील असे महात्मा गांधी यांनी म्हटले आहे.
- घटना समितीच्या उद्घाटन सत्रामध्ये अध्यक्षांनी अमेरिका, चीन प्रजासत्ताक व ऑस्ट्रेलिया या देशांच्या शुभेच्छा संदेशाचे वाचन केले.

# भारतीय राज्यव्यवस्था नोट्स

- **1946 भारताचे अंतरिम सरकारमधील मंत्रीमंडळ -**

| क्र. | मंत्री | खाते |
|---|---|---|
| 1. | पंडित नेहरू | परकिय व्यवहार, राष्ट्रकुल संबंध |
| 2. | सरदार पटेल | गृह, माहिती व नभोवाणी |
| 3. | डॉ. राजेंद्र प्रसाद | अन्न व कृषी |
| 4. | डॉ. जॉन मथाई | उद्योग व पुरवठा |
| 5. | जगजीवन राम | कामगार |
| 6. | सरदार बलदेवसिंग | संरक्षण |
| 7. | सी. एच. भाभा | बांधकाम, खाणी व ऊर्जा |
| 8. | जोगीद्रनाथ मंडल | कायदा |
| 9. | लियाकत अली खान | वित्त |
| 10. | अब्दूर रब निस्तार | पोस्ट व हवाई |
| 11. | असफअली | रेल्वे व वाहतूक |
| 12. | सी. राजगोपालाचारी | शिक्षण व कला |
| 13. | आय. आय. चुद्रीगर | वाणिज्य |
| 14. | गझनफर अली खान | आरोग्य |

- **1947 स्वंतत्र भारताचे पहिले मंत्रीमंडळ -**

| क्र. | मंत्री | खाते |
|---|---|---|
| 1. | पंडित नेहरू | पंतप्रधान, वैज्ञानिक संशोधन<br>परकिय व्यवहार, राष्ट्रकुल संबंध |
| 2. | सरदार पटेल | राज्ये (संस्थाने)गृह,<br>माहिती व नभोवाणी |
| 3. | डॉ. राजेंद्र प्रसाद | अन्न व कृषी, |
| 4. | डॉ. जॉन मथाई | रेल्वे व वाहतूक |
| 5. | जगजीवन राम | कामगार |
| 6. | सरदार बलदेवसिंग | संरक्षण |
| 7. | सी. एच. भाभा | वाणिज्य |
| 8. | डॉ. बी. आर. आंबेडकर | कायदा |
| 9. | षण्मुगम चेट्टी | वित्त |
| 10. | रफी किडवाई | संचार |
| 11. | श्यामाप्रसाद मुखर्जी | उद्योग पुरवठा |
| 12. | मौलाना आझाद | शिक्षण |
| 13. | व्ही. एन गाडगीळ | खाणी, ऊर्जा व बांधकाम |
| 14. | अमृता कौर | आरोग्य |